# भूलभुलैया

शांत निवांत एक कोपरा
हळवा,दुखरा, म्लान जरासा
मौन , पोकळ ,मरगळलेला
विषण्ण मनाला तरी हवासा ॥

न सुटलेली कोडी, जळमट
जुनाट, अडगळ, चित्रे धूसर
अंधार परंतु वाट जवळची
धावत कशी ही जाते सत्वर ॥

कुठून ही जाता तोच कोपरा
खिन्न मनाला चांदणं-चकवा
पुन्हा पुन्हा त्या काळोखाला
अपराधांचा विंझण-वणवा ॥

उरले पाणी ,राख ओघळे ,
धुरकट दिवटे , चंद्र -काजळी
भग्न कोपरा ,धुमसत राही
जीव गुदमरे, कशास खेळी ॥

थांबव वेळी , नको अवेळी
भूलभुलैया ,रिंगण - चकरा
विकट हासरा, वरुनी बावरा
माझा तुझा तो शांत कोपरा ॥

**--------- संध्या रानडे**